म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय
क्र. ७०९६५

मुलांचे मनोरंजन

# बेडूक भटजी





सौ. सुलोचना लिमये
एम्. ए.



IRBK-0110965

व्हीनस बुक स्टॉल : पुणे २

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

अनुक्रम
विभाग
क्रमांक

# बेडूक भटजी



सौ. सुलोचना लिमये
एम्.ए.

म. ग्रं. सं. ठाणे.
वा. क्र. १०९६५
वि. 

IRBK-0110965

व्हीनस

प्रकाशक :
सौ. सुलोचना लिमये
व्हीनस बुकस्टॉल
पुणें २
●
प्रथमावृत्ति : १ ऑगस्ड १९६४
प्रकाशन क्रमांक : ४२
●
© सौ. सुलोचना लिमये
●
**सूचना** : प्रयोग मूल्य ५ रु.
प्रयोग करण्यापूर्वी लेखिकेची लेखी
परवानगी घेतलीच पाहिजे.
●
मूल्य ६० पैसे
●
मुद्रक :
मा. ह. पटवर्धन
संगम प्रेस प्रा. लि.,
३८३ नारायण पेठ, पुणें २

*“ स्वतः हंसोनी जग हांसवावे ”*

*हा मंत्र ज्यांनी मला दिला*

*ते माझे पति*

**श्री. अनंतराव लिमये**

*यांस*

*सुहास्य वदने समर्पण*

*—सुलोचना*

# पात्र परिचय

**शंकरभट** : एक सच्छील पुरोहित

**पार्वती** : शंकर भटांची पत्नी

**इंदिरा** : पार्वतीवाईंची एक परिचित स्त्री

**हुजऱ्या** : संस्थानाच्या राजवाड्यातील एक नोकर

**प्रधान** : संस्थानातील मुख्य प्रधान

**सावित्री** : पार्वतीबाईची एक परिचित स्त्री

**जिव्हा** : राजवाड्यातली एक दासी

**राजा** : संस्थानचा अधिपति

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.

# निवेदन

केवळ फुला-फळांचेच ऋतु असतात असें नाहीं. नाटकांचे-सुद्धां ऋतु, असतात. त्या त्या ऋतूंन त्यांना बहर येतो. गणेशोत्सव, शारदोत्सव, शाळांची संमेलने, आंतरशालेय नाट्य स्पर्धा, वासंतिक उत्सव, एकांकी स्पर्धा, आणि नाट्यवाचन यांसाठी मधुमक्षिके प्रमाणें नाट्यप्रेमीही नाटकाच्या शोधार्थ गुंजारव करतात. या काळात एक अगदी छोटा नाट्यमधुघट मी पण भरू इच्छिते. तोच हा बेडूक भटजी.

सुटसुटीत नेपथ्य, सोपे प्रयोग साहित्य, व्यवहारांतली वेषभूषा, थोडी चाल बदलून तुमच्या आमच्यातलीच. नाहीं म्हणायला दोन प्रवेशांमध्यें एक पडदा हवाच. अन् भटजी हा भटजीच दिसावा. या नाटुकल्यानें प्रेक्षकांची घटकाभर करमणूक करावी. चेहऱ्याची सुरकुती मोडून हास्यरेषा उमटावी. पोट धरून हंसणें ही ज्याची त्याची प्रकृति.

१ ऑगस्ट १९६४
पुणें २

सुलोचना लिमये

अनुक्रम ... विभाग ... क्रमांक ३१४४ नों. दि. ...

# बेडूक भटजी

## प्रवेश १ ला

( रंगभूमीवर दोन पाट शेजारी शेजारी ठेवलेले आहेत. एका पाटावर शंकर भटजी बसले आहेत. शेजारी तांब्या, भांडे, पळी, पंचपात्री, ताम्हन ठेवले आहे. पडदा उघडताना पाटावर बसलेले भटजी पळीने हातात पाणी घेऊन आचमन करतात व तोंडाने पुटपुटतात. नंतर मोठ्याने )

**शंकर भटजी :** **अन्नासाठी दाही दिशा । आम्हा फिरविसी जगदीशा ।**
**कृपाळू बा परम पुरुषा । करुणा कैसी तुज न ये ।**

( तोंडाने असे म्हणत असतानाच ताम्हन, पळी, बाजूला सारतात. दुसरा पाट आपल्यापुढे ओढून घेतात. त्या पाटावर बासनात गुंडाळलेली पोथी आहे ती काढतात. कुठलेही एक पान उघडून वाचतात–)

**भटजी :** **न मिळो खावया । न वाढो संतती ।**
**परी राहो चित्ती । भगवंत ।।**

( याच वेळी त्यांची पत्नी पार्वती बाहेरून येते. ती फार खुशीत आहे. नवरा काय करतो आहे हे पाहण्यासाठी थबकून उभी राहाते )

( हरदासी थाटाने भटजी पुन्हा तोच अभंग म्हणतो )

**भटजी :** **न मिळो खावया । न वाढो संतती ।**
**परी राहो चित्ती । भगवंत ।**

**पार्वती :** वा, वा, वा, वा. छान डोहाळे लागले आहेत हं. हे का मागताहात तुम्ही देवापाशी ? इथ अन्नाविना गालफडं बसली आहेत. लोकांपुढे तोंड वेंगाडून तोंड फाटायची वेळ आली आहे. १२ वर्ष पिंपळाचा पार झिजवून पोर नाही पोटी. अन् म्हणे (तोंडाने वेडावून) न मिळो खावया, न वाढो संतती–

**भटजी** : अग, अग, अग, पण किती संतापशील. असं देवापाशी मागून का कधी खरं होतं ?

**पार्वती** : नाही ना होत ? मग कशाला मागताय देवापाशी ? कुठं मेला देव लपून बसलाय कोण जाणे.

**भटजी** : बरं झालं लपून बसलाय ते. खरच त्याने ऐकलं तर !

**पार्वती** : अँ हँ हँ हँ. म्हणे खरच त्याने ऐकलं तर ! इच्छा तशी फळं. नेमकं एवढच त्याला ऐकू जात असेल. म्हणून तर वर्षंन् वर्षं खायलाही देत नाही आणि पोरही देत नाहीं.

**भटजी** : अग पण यात देवाचा काय दोष ?

**पार्वती** : मग कुणाचा ? माझा ?

**भटजी** : अन् मग काय माझा का ?

**पार्वती** : देवाला माहीत.

**भटजी** : पण तो तर लपून बसलाय ना ? एकूण भिंतीला अन् देवाला कान असतात म्हणायचे.

**पार्वती** : पुरे झाली तुमची थट्टा. माणसाला जनाची नाही तर मनाची तरी थोडी असावी. खुशाल त्या दिवशी लक्ष्मणभावजींना सांगत होता की मी फार सुखी आहे म्हणून. काय हे काय बोलणं झालं ?

**भटजी** : अग, पण तो मला म्हणत होता की "दादा, काशीहून मी परतलो की आपण मोठ्ठं गंगापूजन करू. पण काशीला गेल्यावर मी काय सोडणार ते तुला माहीत आहे कां ? "

**पार्वती** : हो ! अन् त्यावर तुम्ही म्हणाला की 'माझ्यासारखं तुला सुखी व्हायचं असेल तर मी सोडलं ते तूं सोड.

**भटजी** : अन् त्यावर मी म्हटलं "एक लज्जां । परित्यज्य । निर्लज्ज सदासुखी ॥ ( खो, खो, करून हसतो )

**पार्वती** : तुम्ही सोडली असाल एक लाज. पण मी नाही सोडली. म्हणे न मिळो खावया, न वाढो संतती ।। माझ्या आई बाबांना हे माहीत असतं तर चुकून दिली नसती तुमच्या घरात. कुठून दुर्बुद्धी झाली– ( रडायला लागते )

**भटजी** : अग, अग, अग. पण एकदम असं रडायला काय झालं ? मी काय तुला मारतो आहे कां झोडतो आहे ?

**पार्वती** : तेवढच राहिलं आहे आता. इतके दिवस पोटावर मारतच आलात, आतां पाठीवर मारा म्हणजे झालं. फुटका मणी नाही अंगावर. पुराणांतून अन् कीर्तनांतून पण मिळत नाही उत्पन्न काही. तुम्ही जाता ब्राह्मण म्हणून जेवायला, पण मलाही पोट आहे म्हटलं. ते काही नाही. इतके दिवस फार ऐकून घेतलं. फाऽर सोसलं. पण यापुढे मात्र मुळीच ऐकणार नाही.

**भटजी** : म्हणजे काय करणार आहेस ? ब्राह्मण जेवायला बोलावला की धोतर, जानवं घालून तूं जाणार की काय ?

**पार्वती** : तेच करायला हवं आहे या ढोंगी जगात. तुमचे ज्ञानेश्वर महाराज म्हणतात ना ' नाठाळाचे माथा घालू काठी–

**भटजी** : अग ज्ञानेश्वर महाराज नव्हे – ( हंसू आवरत नाही )

**पार्वती** : बरं असेल मेला कुणी. ज्ञानेश्वर नाही तर त्याचा काका.

**भटजी** : त्याचा काका ? त्याचा काका झाला तरी तुझ्यापुढे बोलायची त्याची काय टाप लागली आहे ?

**पार्वती** : हे पहा हे असलं उलटं पालटं बोलणं मला नाही जमत. ' बोलाचाच भात, बोलाचीच कढी ' ते तुम्हाला जमतं.

**भटजी** : मग तुझं म्हणणं काय ?

**पार्वती** : मला काही कमरेचं सोडून डोक्याला गुंडाळायचं नाही.

अन् सदासुखी पण व्हायचं नाही.

**भटजी** : बरं ऽ. पण तुझं म्हणणं काय ?

**पार्वती** : हे पाहा एक तप मी तुमचं ऐकलं. पण आता मात्र तुम्हाला माझंच ऐकलं पाहिजे. तुमची कळली पैसे मिळवायची अक्कल.

**भटजी** : तूं आहेस ना शहाणी ? मग आता तूं मला शिकव. 'शहाणी सुरती अन् गाढवाची चुलती'.

**पार्वती** : मी शिकले असते तर कशाला तुमच्या तोंडाकडे पाहिलं असतं ?

**भटजी** : माझ्या अंत:करणाकडे तर पाहा.

**पार्वती** : असेल तर ना ? असतं तर बायकोचे असे हालच केले नसते. काय हे तुमचं वागणं ? मला एक नेसूंच लुगडं घ्या म्हटलं तर होईना. अन् परवा सासूबाई आल्या तर त्यांना लगेच लुगडं घेतलं.

**भटजी** : अग पण ती माझी आई आहे. मी जगाला शंकरभट असलो तरी तिचा बेडूकच आहे.

**पार्वती** : अन् हे तरी काय हो वागणं ? एवढा मोठा आपला मुलगा झाला तरी त्याला बेडूक कसलं हाक मारायचं ?

**भटजी** : कोकणातल्या विहिरीवर खूप बेडकं असायची. मी लहानपणी बेडकासारखा उड्या मारायचा. पडलं तेच नाव. त्यात बिघडलं कुठं ?

**पार्वती** : इश्य. पण त्या खुशाल बेडूऽऽक म्हणून हाक मारतात. अन् तुम्ही आपले ओ देता ?

**भटजी** : मग तुझ्या नाही का हाकेला धावून येत ?

**पार्वती** : उजेड तुमचा. मी मेले तरी धाऊन येणार नाहीं.

**भटजी** : अन् आलो, तरी मेल्यावर तुला काय कळणार ?

**पार्वती** : हो. म्हणजे मी मेले तरी—

**भटजी** : तूं मेलीस ? मग काय भूत बोलतय् तुझं ?

**पार्वती** : मी मेले तर तुम्हाला काय त्याचं ? आत्ताच माझं मन मारलत.

**भटजी** : तरी बरं. सगळं तुझ्या मनाजोग करतो.

**पार्वती** : माझ्या मनाजोगं ?

**भटजी** : होय. होय. प्रत्येक गोष्ट तुझ्या मनाजोगी.

**पार्वती** : पाहा बरं. मग बदलाल. दुतोंडीपणा कराल.

**भटजी** : म्हणजे ? मी काय गांडूळ आहे वाटतं ?

**पार्वती** : विषय नका बदलू. पैसे मिळवायचा मी एक उत्तम मार्ग शोधला आहे.

**भटजी** : असं ? मग माझं कामच संपलं.

**पार्वती** : (वेडावत) ह्यॅ, ह्यॅ, म्हणे माझं कामच संपलं. तुम्हालाच करायला लावणार आहे काम.

**भटजी** : मला ?

**पार्वती** : हो तुम्हाला. ( लाडात येऊन ) कराल ना ?

**भटजी** : लाडके तुझ्यासाठी मी काय करणार नाही ? जीवसुद्धा ओवाळून टाकीन.

**पार्वती** : सध्या जीव नको आहे ओवाळून टाकायला. पण अक्कल मात्र टाका ओवाळून. म्हणजे फक्त यापुढे मी सांगेन तसं करायच. स्वत:ची अक्कल चालवायची नाही. मग पैसाच पैसा.

**भटजी** : म्हणजे ? काय टांकसाळीवरचा पहारेकरी करतेस का काय मला ? छान ! मग मी तुरुंगांत अन् तूं बंगल्यात ! चांगलं आहे भविष्य.

**पार्वती :** हेच. हेच. हेऽऽच मी तुम्हाला करायला सांगणार आहे.

**भटजी :** काय चोरी ?

**पार्वती :** नव्हे हो. माझं भविष्य सांगितलंत ना ? तसं यापुढे लोकांच भविष्य सांगायच.

**भटजी :** मी ? अन् भविष्य ? उगीच काय माझ्या राशीला लागतेस ?

**पार्वती :** बघा. लागलात भविष्याची भाषा बोलायला. "माझ्या राशीला लागतेस" असंच राशी भविष्य सांगायचं.

**भटजी :** कसा नक्षत्रासारखा आपला राजाराणीचा संसार, अन् हे काय खूळ भरलं तुझ्या डोक्यात !

**पार्वती :** बघा. नक्षत्रं आलीं. राशी आल्या. झालं भविष्य. लोक तुम्हाला हात दाखवतील. प्रश्न विचारतील.

**भटजी :** आणि मग ?

**पार्वती :** तुम्ही नुसती त्याची उत्तरं द्यायची.

**भटजी :** अग पण मला काही कळलं पाहिजे ना त्यांतलं ? त्याला अभ्यास करावा लागतो.

**पार्वती :** काही अभ्यास करावा लागत नाही. मनाला येईल ते सांगायचं.

**भटजी :** अन खोटं निघालं तर ?

**पार्वती :** मग भविष्य कधी खरं निघतं ? आमच्या बाबांना भिकंभटजींनी सांगितलं होतं की राजासारखं स्थळ मिळेल तुमच्या पोरीला. लक्ष्मीसारखी सोन्याने मढेल. राणीचं भाग्य आहे राणीचं.

**भटजी :** मग खरं सांगितलं त्यांनी, नाही कां तू माझी राणी ? अन् लक्ष्मी पण आहेस, फक्त कडकलक्ष्मीं आहेस एवढंच.

**पार्वती :** वा. वा. अन् तुम्हीं मोठे भोळे सांब ! म्हणून तर

तुमच्या राज्यात लंकेची पार्वती झाले आहे मी. कुठे गेलं राणीपद? सगळं खोटं. पण भिकंभटांनी दिलं झोकून भविष्य. अन बाबा पण भुलले आमचे. अहो दमडी सुटायची नाही त्यांच्या हातून; पण खणखणीत रुपया काढून दिला भिकंभटांना.

**भटजी** : म्हणजे ! मला असा रुपया मिळेल म्हणतेस ? नको आपल्याला.

**पार्वती** : ते काही नाही. तुम्हाला भविष्य सांगितलच पाहिजे. प्रश्न कुंडली मांडायाची.

**भटजी** : हा कुंडलीचा कसला प्रश्न काढलास आणखी ?

**पार्वती** : अहो असं काय करता ? वेळेवर उत्तर द्यायचं.

**भटजी** : अग पण तयारी नसताना मला कसं वेळेवर उत्तर सुचणार ?

**पार्वती** : कपाळ माझं.

**भटजी** : अन् तूं लोकांच्या कपाळी काय आहे ते मला पाह्यला सांगतेस ? आपल्याला नाही जमायचं. ( चालायला लागतो. )

**पार्वती** : चाललात कुठे ? ( हाताला धरून बसवते. ) बसा इथे. आतापासून सुरुवात करा. तुम्हींच म्हणता ना शुभस्य शीघ्रम् म्हणून. मनात आलं की लगेच करून टाकावं. मी सगळी कच्ची तयारी करून देईन. मग तर झालं ?

**भटजी** : म्हणजे ? कच्ची तयारी कसली ?

**पार्वती** : तुम्हीं पाहा तर खर. अहो आपल्या इंदिराबाई आहेत ना ? त्यांना पाच मुली आहेत. पुन्हा दिवस गेले आहेत. त्यांना हवा आहे मुलगा.

**भटजी** : बरं मग ?

**पार्वती** : मग काय ? काल भेटल्या होत्या मला. मी म्हटलं

आमच्या ह्यांना ज्योतिष चांगलं समजतं. ५ वा महिना आहे त्यांना. मी म्हटलं तुम्ही आमच्या ह्यांना विचारा. ते तुम्हांला बरोबर सांगतील.

**भटजी** : अग पण काय सांगतील ?

**पार्वती** : मुलगा होणार कां मुलगी ते. आत्ता एवढ्यात येतील हं त्या.

**भटजी** : अग पण मी काय सांगणार ? मला काय कळतय त्यात ?

**पार्वती** : अहो असं काय करता ? त्या येतील. मनातला प्रश्न विचारतील. पाटी पेन्सिल घेऊन आकडेमोड करायची. अन् सांगायचं.

**भटजी** : पण काय सांगू ?

**पार्वती** : सांगा मुलगा होईल म्हणून.

**भटजी** : अन् नाही झाला तर ?

**पार्वती** : मग सांगा मुलगी होणार म्हणून.

**भटजी** : आणि मुलगी नाही झाली तर ? (जरा घाबरतो). नाही गं. पण मुलगीही नाही झाली तर ?

**पार्वती** : इश्य. हे काय तुमचं बोलणं ? मुलगा किंवा मुलगी. कांही तरी होणारच.

**भटजी** : तसं नव्हे गं. पण काहीच झालं नाही तर ?

**पार्वती** : कपाळ माझं. अहो असं कसं होईल ?

**भटजी** : (अडखळत) नाही. म्हणजे ... तुझ्यासारख अर्धवट–

**पार्वती** : हात जोडले तुमच्यापुढे. 'दैव देतं अन् कर्म नेतं'! अहो काहीका होईना तिकडे. आता मुलगा सांगून द्या. चार आठ आणे मिळतील तेवढे. (बाहेरच्या दरवाज्याजवळ चाहूल घेते). कोण आहे ?

**हुजऱ्या** : होय महाराज.

**प्रधान** : यासाठी दुसरा उपाय करायला हवा.

**हुजऱ्या** : होय महाराज.

**प्रधान** : आकाश पाताळ एक केलं पाहिजे.

**हुजऱ्या** : होय महाराज.

**प्रधान** : मी काय डोकं गहाण टाकलंय असं समजतोस तूं ?

**हुजऱ्या** : होय महाराज.

**प्रधान** : होय महाराज काय ? डोकं आहे ना जाग्यावर ?

**हुजऱ्या** : नाही महाराज.

**प्रधान** : नाहीं ?

**हुजऱ्या** : तसं नाही महाराज. माझच डोकं जाग्यावर आहे कां नाही पाहात होतो. माझ्या डोसक्यात या चोरीला एक रामबाण उपाय आहे.

**प्रधान** : तुझ्याजवळ ? म्हणजे माझ्यापेक्षा स्वतःला शहाणा समजतोस काय ?

**हुजऱ्या** : (गडबडून) होय महाराज, नाही महाराज.

**प्रधान** : मग ?

**हुजऱ्या** : महाराज. गावचा एक पंडित ज्योतिषी आहे. शंकर भट. त्याच्या डोक्याबद्दल म्हणत होतो. तो सगळ्या चोऱ्या अगदी बरोबर हुडकून काढतो.

**प्रधान** : मी नाही कधी नाव ऐकलं ?

**हुजऱ्या** : वा महाराज. घरोघरी त्याची प्रसिद्धी आहे. दाराशी रीघ असते नुसती. त्याची बायकोच सांगत होती परवा.

**प्रधान** : असं ?

**हुजऱ्या** : होय महाराज.

**प्रधान** : मग बोलाव त्याला इकडे राजवाड्यावर. पण बदनामी केलीस तर याद राख.

**हुजऱ्या** : होय महाराज. नाही महाराज.

**प्रधान** : जा त्याला बोलाव. (हुजऱ्या जायला निघतो.)

**प्रधान** : हे बघ. भटजींना बोलाव. परंतु कुणाला कळता कामा नये. अगदी या कानाची गोष्ट त्या कानाला कळता कामा नये. भविष्य पाहाणं म्हणजे आडाणीपणा. मुख्यमंत्री भविष्य पाहातो म्हणजे काय ?

**हुजऱ्या** : पण महाराज त्यात काय मोठसं ? आपले अर्थमंत्री आणि उद्योग मंत्री दोघांनी त्यांना आपल्या कोठीवर बोलवून हात आणि पत्रिका दाखवली. पण अगदी गुपचुप.

**प्रधान** : कशासाठी रे ?

**हुजऱ्या** : नाही म्हणजे सरकार.....म्हणजे....

**प्रधान** : म्हणजे म्हणजे काय ? स्पष्ट बोल.

**हुजऱ्या** : नाही म्हणजे सरकार, आपलं मुख्यमंत्र्याचं पद त्यांना केव्हा मिळेल हे त्यांना विचारायचं होतं.

**प्रधान** : असं ? मग काय सांगितलं भटजींनी ?

**हुजऱ्या** : ते नाही कळलं सरकार. पण त्याच्याच दुसऱ्या दिवशी इथल्या हायस्कूलच्या संमेलनात उद्योगमंत्र्यांच भाषण झालं. तेव्हा त्यांनी सांगितलं 'भविष्य म्हणजे निव्वळ थोतांड. आडाणीपणा. मूर्खाचा बाजार. मनगटाच्या जोरावर तरुणांनी काम करावं. दगडाच्या देवाला काय पुजता ? '

**प्रधान** : होय होय मी हजर होतो ना त्या भाषणाला.

**हुजऱ्या** : अन् सरकार त्याच्याच पुढच्या सोमवारी शंकर भटांना बोलवून त्यांनी शंकराला अभिषेक केला अन् पुन्हा प्रश्न

कुंडली मांडून मुख्यमंत्रीपदाचा योग विचारला.

**प्रधान** : कमाल झाली या ढोंगबाजीची. आपल्याला हे मुळीच पसंत नाही. माझा विश्वास नाही या भविष्यावर.

**हुजऱ्या** : मग सरकार कशाला बोलावू शंकर भटाला ?

**प्रधान** : अरे पण तू म्हणतो आहेस एवढा तर बोलाव. पण अगदी गुपचुप हं. पळ पळ लौकर.

(हुजऱ्या जातो. पडदा पडतो)

## प्रवेश ३ रा

[ मधल्या पडद्यापुढे. सकाळची वेळ. पार्वती पाट मांडते. आतल्या बाजूने येऊन शंकर भटजी पाटावर बसतात. ते जांभया देत आहेत. पार्वती चहाचा कप घेऊन येते. ]

**पार्वती** : इश्य एक दिवस जरा कुठे लौकर उठवलं तर हे कसलं जांभया देणं ? सकाळी उठल्यापासून माझा डावा डोळा लवतो आहे. नक्की आज लाभ आहे. आत्ता येतील सावित्रीबाई.

**भटजी** : अग पण माझी आंघोळ ?

**पार्वती** : कशाला हवी आहे 'आंघोळ ? ब्राह्मण किती झाला भ्रष्ट तरी तिन्ही लोकी श्रेष्ठ.

**भटजी** : तू मला लौकरच तिसऱ्या लोकात पाठवणार. ( वर आकाशाकडे हात दाखवतो ).

**पार्वती** : उगीच अभद्र बोलू नाही सकाळच्या वेळी.

**भटजी** : हं. फक्त अभद्र करावं.

**पार्वती** : यात अभद्र काय आहे ? काल मी सकाळी गेले होते सावित्रीबाईकडे. त्यांचा तान्हा मुलगा रडत होता. त्यांना आंघो-

ळीची गर्दी होती. मला म्हणाल्या, "पार्वतीबाई, घेता का पाच मिनिटं याला ? मी आंघोळ करून येते."

**भटजी :** मग ? त्यात सांगायचं काय ?

**पार्वती :** तसं नव्हे हो. बाळाला खेळवायला लागले तर त्याच्या गळ्यातली सोन्याची साखळी दिसली मला.

**भटजी :** मग ? ( जरा घाबरून )

**पार्वती :** तेवढी मी काढून घेतली. म्हटलं लगेच काही यांच्या लक्षात यायचं नाही.

**भटजी :** शुद्धीवर आहेस का तूं ? चोरी केलील तूं ? १२ वर्षे मी दारिद्र्याशी झगडलो. शंभर घरी पूजा केली, पण कधी फूल-सुद्धा उचललं नाही. अन तू सोन्याची चोरी केलीस ?

**पार्वती :** याला काय चोरी म्हणतात ?

**भटजी :** लाज नाही वाटत बोलायला ? काय, झालय काय तुला ? दुसऱ्याच्या वस्तूची चोरी ?

**पार्वती :** अहो असे संतापता काय ? नुसतं काढून घेतलं की चोरी होते कां ?

**भटजी :** जगदंबे, मग काय केलं म्हणजे चोरी होते ? जीव घेतला म्हणजे चोरी होते ? डाकिण.

**पार्वती :** ती वस्तू आपल्या घरी आणली म्हणजे चोरी होते. मी काय घरी आणली कां ?

**भटजी :** मग काय केलसं ?

**पार्वती :** त्यांच्या देव्हाऱ्यात टाकली.

**भटजी :** देव्हाऱ्यात ? ती कशाला ?

**पार्वती :** सांगते. जरा नीट ऐकाल तर. आता त्या खूप शोधा-शोध करणार. कारण काल तिन्ही सांजा मी मद्दाम त्यांना हळदी

कुंकवाचं आमंत्रण करायला गेले होते. तर रडून रडून डोळे लाल झालेले दिसले.

**भटजी** : मग सांगितलं नाहीस त्यांना ?

**पार्वती** : हो. सांगितल ना. मी म्हटलं सावित्रीबाई रडू नका. आमच्या, ह्यांना ज्योतिष छान समजतं. उद्या सकाळी उजाडत या आमच्याकडे. हे तुम्हाला बरोबर सांगतील. कशी हरवली. केव्हा सापडेल. सगळं सांगतील. तेव्हां म्हणाल्या आताच येते. म्हटलं आता ते अभिषेकाला गेले आहेत. उद्या या.

**भटजी** : माझ्या डोळ्याचा अभिषेक करायची वेळ आणली आहेस. कुणी सांगितल्या या उचापती करायला ?

**पार्वती** : उचापत काय त्यात ? मी काय चोर आहे की काय ? आत्ता येतील त्या. त्यांना सांगा तुमच्या घराची पूर्व दिशा शोधा. तिथें नक्की सापडेल. घरातच आहे. घरच्या शंकराला अभिषेक करा. गेल्या बरोबर देवाची पूजा करा"

**भटजी** : काय हे तुझं डोकं !

**पार्वती** : असू दे हो. नुसतं टोपी ठेवायच खुंटाळं असण्यापेक्षा बरं.

**भटजी** : काय म्हणालीस ?

**पार्वती** : नाही म्हटलं पूजा करायला लागले की आपच सापडेल साखळी. अन् मग खूष होऊन देतील पाच दहा रुपये.

( सावित्री येते. बाहेरूनच हाका मारते )

**सावित्री** : पार्वतीबाई, अहो पार्वतीबाई.

**पार्वती** : आल्या हं त्या. बसा पटकन पाटावर. ( दाराजवळ जाऊन ) या या. या हो या सावित्रीबाई. बसा. ऐकलं का ? यांचा प्रश्न आहे.

**भटजी :** काय बोला.

**सावित्री :** बाळाची साखळी हरवली आहे. ( हुंदका देते. रडलेल्या आवाजात ) केव्हा सापडेल हो ?

**भटजी :** केव्हापर्यंत होती ?

**सावित्री :** ह्यांना विचारा. ह्या होत्या तेव्हा होतीच, नाही कां हो ?

**भटजी :** अहो, त्यांना तर सगळच माहीत आहे.

**सावित्री :** म्हणजे ऽऽ ?

**पार्वती :** म्हणजे ... म्हणजे ... ( गडबडते )

**भटजी :** म्हणजे त्यांनीच काल सांगितलं मला.

**पार्वती :** अहो काय काही तरी बोलता ?

**भटजी :** त्या म्हणाल्या काल संध्याकाळी –

**सावित्री :** काय ?

**भटजी :** की तुमच्या मुलाची साखळी गेली म्हणून.

(पार्वती सुटकेचा श्वास टाकते)

**हुजऱ्या :** (हुजऱ्या येतो. बाहेरून हाक मारतो.) शंकर भट, अहोऽ शंकर भऽऽट.

**पार्वती :** कोण आहे ?

**हुजऱ्या :** मी. (आत येतो.) शंकरभट उठा, उठा. जसे असाल तसें चला वाड्यावर.

**भटजी :** अहो कां पण ? एवढी घाई कसली ?

**हुजऱ्या :** तुम्हाला प्रधानजी बोलावताहेत वाड्यावर. लाखाची चोरी झाली ना ? त्यात रत्नाचे हार, सोनं, नाणं, सगळं आहे बघा. पण कुठ्ठे तपास लागत नाही. तेव्हा तुम्हाला प्रश्न विचारायचं ठरलय.

**भटजी** : मला ? (मटकन खाली बसून कपाळाला हात लावतो.)

**पार्वती** : अहो त्यांना आज बरं नाही हो.

**भटजी** : ते कांही नाही. संस्थानाचं काम आहे. चला लौकर लौकर. अगदी असाल तसे चला.

(हुजऱ्या भटजींना घेऊन जातो. पार्वती व्याकुळ होऊन दरवाजापर्यंत जाते. व बाहेरच पाहत राहते. शेवटी त्याच्या मागे जाते.)

**हुजऱ्या** : पार्वताबाय, तुम्ही नका येऊं.

(पार्वती मटकन खाली बसते)

**सावित्री** : पार्वतीबाई, माझ्या प्रश्नाच काय हो ?

**पार्वती** : तुमचं ना ? तुमना प्रश्न मी कालच विचारला ह्यांना.

**सावित्री** : मग ?

**पार्वती**: अहो रात्रभर आकडेमोड तरीत होते. डोळ्याला डोळा नाही. अखेर पहाटे निर्णय झाला. उत्तर सापडलं.

**सावित्री** : काय सापडलं ?

**पार्वती** : तुमच्या घरात पूर्वेच्या बाजूला साखळी पडली आहे. नेणारी व्यक्ति मध्यम वयाची आहे. साखळी सुरक्षित आहे. दहा वाजेपर्यंत सापडेल.

**सावित्री** : तोंडात साखर पडो तुमच्या.

**पार्वती** : पण ते म्हणाले सापडेपर्यंत चित्त लागलं नाही तरी तुम्हीं स्वत: आज देवपूजा करा : नंतर सापडेल. पण नुसत्या साखरेनं नाहीं भागायचं हो. सवाष्णीला हिरवी साडी नेसवायची. अन् सव्वा रुपया दक्षिणा.

**सावित्री** : देईन हो. देईन. दुसरं कुणाला ? तुम्हालाच नेसवीन.

**पार्वती** : तसं नव्हे हो. पण हल्ली त्यांना सिद्धी प्राप्त झाली आहे ना ?

**सावित्री** : खरं आहे बाई. उगीच का राजवाड्यात बोलवलं ? वर येऊ मी ?

**पार्वती** : (त्यांना कूंकू लावते.) या. हं.

## प्रवेश ४ था

[ मधला पडदा वर जातो. आत शंकरभट बसला आहे. त्याला नजरकैदेत ठेवलं आहे. एका बाजूने जिव्हा दासी व दुसऱ्या बाजूने हुजऱ्या येतो.]

**हुजऱ्या** : भटजी ? काय सापडलं का उत्तर ? लौकर शोधा. निष्कारण ही कैद कशाला ? मी जातो. या जिव्हाबाई करतील पहारा.

**भटजी** : काय बोलू बाबा ! माझी मती गुंग आहे. पाहतो प्रयत्न करून.

**हुजऱ्या** : (जिव्हेला घेऊन जरा बाजूला होतो.) जिव्हाबाई, मी घंटाभरात परत येतो. तोपर्यंत यांच्या तोंडून कांही शब्द बाहेर पडले तर ऐकून ठेवा. त्यांची समाधी लागते तेव्हां ते कांहीतरी बोलतात. तेंच त्यांच उत्तर असतं म्हणे.

**जिव्हा** : बरं. बरं. अक्षी जिवाचा कान करून ऐकत्ये.

(भटजी डोळे मिटून बसतो.)

**भटजी** : (डोळे मिटूनच) आलिया भोगासी असावे सादर । देवावरी भार घालूनिया । अरेरे, परमेश्वरा, काय हे घडलं ? पण परमेश्वराचा काय दोष ? याला कारण ही जिव्हा. अग चांडाळणी लोभापायी, नुसत्या हावरटपणापायी तूं हे काय केलस ? कां खोट बोललीस ? दुसऱ्याचे पैसे खोटया मार्गाने लुबाडलेस. तुला तुरुंगवासाची शिक्षा पाहिजे.

**जिव्हा** : महाराज मला क्षमा करा. महाराज.

**भटजी** : (डोळे उघडतो. तिच्याकडे न पाहता विरुद्ध दिशेला पाहतो.) नवऱ्याने बायकोला, किंवा बायकोने नवऱ्याच्या खोटेपणाला साथ देणं, हें महान पाप आहे. याला कारण ही जिव्हा. ही जीभच. आडवी कापली पाहिजे तिलाच.

(जिव्हा भटजींच्या पायांवर लोळण घेते.)

**जिव्हा** : महाराज क्षमा करा मला. क्षमा करा महाराज. माझं फार फार चुकलं, लई चुकलं बगा.

**भटजी** : (डोळे उघडून) काय म्हणालात ?

**जिव्हा** : मी सगळं खरं खरं सांगेन. खोटं बोलणार नाहीं. बोलले तर आपण म्हणालात तसं मला खरच आडवी कापा.

**भटजी** : काय बोलतेस तूं ? मला तर कांहीच कळत नाहीं.

**जिव्हा** : महाराज नका असा अंत पाहूं. आपण साक्षात् परमेश्वर. सगळ कळत आपल्याला. चोरी माझ्या नवऱ्यानेच केली. ते सगळे दागिने हतच हैती पगा ! म्या ते दागिने चोरले अन माझ्या नवऱ्याने याच बागेत त्या वडाच्या झाडाखाली पुरलं हैती ! जगभर पोलिस फिरले तरी कसे गवसणार ? खाकेत कळसा अन गावाला वळसा. मला वाचवा महाराज. ही घ्या सोन्याची मोहोर.

**भटजी** : कुठे आहे सगळं धन ? आहे तसं सगळं माझ्या स्वाधीन कर. जा. जा लौकर. (ती जाते) काय आश्चर्य ? मी माझ्या जिभेला दोष देत होतो, तर नेमकं हिचच नांव जिव्हा निघालं. परमेश्वरा, कधी ना कधी तरी दुष्कृत्य बाहेर येतं. तूं पाठीराखा आहेस. तुला माझा साष्टांग. (नमस्कार घालतो. पडदा पडतो.)

## प्रवेश ५ वा

[ एका बाजूने पार्वती व दुसऱ्या बाजूने हुजऱ्या येतो. दोघांची भेट होते. ]

**हुजऱ्या :** ऐकलं का पार्वतीबाई ? शंकरभटांनी ज्योतिष सांगून लाखाची चोरी शोधून काढली.

**पार्वती** : काय म्हणता ?

**हुजऱ्या** : हो तर. नवरत्नांचा हार, मोहोरा. सगळं सगळं जसच्या तस्सं मिळालं. आज त्यांना दरबारात बोलावलं आहे. तुम्ही या वाड्यावर. (जातो.)

**पार्वती** : खरं कां ? आई जगदंबे मला मिळणारं हिरवं लुगडं तुलाच नेसवीन ग बाई.

(दुसऱ्या बाजूने सावित्री येते)

**सावित्री** : हें काय, पार्वतीबाई अशा रस्त्यात उभ्या ?

**पार्वती** : अहो वाड्यावरची लाखाची चोरी आमच्या ह्यांनी अंतर्ज्ञानानं शोधून काढली, आज वाड्यावर त्यांचा सत्कार आहे.

**सावित्री** : खरं ? असेल बाई. आमची नाहीं का साखळी सापडली ! पण मला नवल वाटतं की ती देव्हाऱ्यात कशी गेली ?

**पार्वती** : अहो कुणी चोरानं नेली असेल. पण आमच्या ह्यांनी अंतर्ज्ञानानं ती देव्हाऱ्यांत आणली असेल. तशी सिद्धी प्राप्त झाली आहे ना यांना.

**सावित्री** : खरं ना ? असेल बाई.

**पार्वती** : सावित्रीबाई तुम्ही माझी ओटी भरणार होता ना ? नाही म्हटलं मला राजवाड्यावर जायचंय. तेवढीच झुळझुळीत झाली असती नेसायला. साडी ऐवजी शेला दिला तरी चालेल हो.

**सावित्री** : अहो मी देणार का नाही ? चला माझ्याकडे. (दोघी जातात.)

अनुक्रम
विभाग
क्रमांक

## प्रवेश ६ वा

[पडदा उघडतो. राजा आसनावर बसला आहे. शेजारी प्रधान बसला आहे]

**राजा** : प्रधानजी या ज्योतिषाने आपल्या अंतर्ज्ञानाने आणि परमसिद्धीने एवढा चोरीचा शोध लावला म्हणता, तरी तुमचा त्याच्यावर विश्वास बसत नाही ?

**प्रधान** : राजाधिराज, आपल्यापुढे लहान तोंडी मोठा घास मी काय घ्यावा ? पण राजकारणात खुंटा हलवून बळकट करायचा असतो. सर्वांसमक्ष त्याची एकदा परीक्षा घ्यावी हे बरं.

**राजा** : काय घेणार तुम्ही परीक्षा ?

**प्रधान** : आपली समस्त दरबारी मंडळी आज उपस्थित आहेत. त्यांना या दोन्ही बाजूंना अशा तऱ्हेने बसवले आहे की त्यांना तर शंकर भटजी दिसतील. पण भटजींना मात्र कोणी दिसणार नाही.

**राजा** : बरं. पुढे.

**हुजऱ्या** : (लवून नमस्कार करतो.) महाराज शंकरभटांची मंडळी आली आहेत. आपल्याला आत यायला मिळावं अशी त्यांची विनंती आहे. (राजा प्रधानाकडे पाहतो.)

**प्रधान** : त्यांना म्हणावं थोड्या वेळानं या. जरा बाहेरच थांबा.

**हुजऱ्या** : जी हुजूर.

**प्रधान** : महाराज आपण गैर मानणार नसाल तर आम्हीं त्यांची परीक्षा घेऊं. एक तो तरी हरेल. नाहीं तर आम्ही तरी हरूं.

**राजा** : काय दिव्य आहे हे !

**प्रधान** : कोण आहे रे तिकडे ? (जिव्हा येते. नमस्कार करते) हे पाहा आतल्या बाजूला एक मूल्यवान कलश ठेवला आहे. तो घेऊन ये. (जिव्हा कलश आणते.) ठेव समोर. महाराज या कुंभात मी वस्तु

ठेवून त्याचे तोंड बंद केले आहे. भटजींनी आतली वस्तु ओळखावी. ते जिंकले तर मी प्रधानपद सोडीन.

**राजा** : आणि हरले तर ?

**प्रधान** : तर हातकड्यांचा आहेर.

**राजा** : जिंकले तर ?

**प्रधान** : आपण म्हणाल तें.

**राजा** : ठीक आहे. पहारेदार, (हाकेसरशी हुजऱ्या येतो.)

**हुजऱ्या** : जी हुजूर.

**राजा** : भटजीना आणि त्यांच्या मंडळींना घेऊन ये. (भटजी घाबरला आहे. पार्वती उत्तम साडी नेसून झोकात येते.) बसा शंकरभट.

(भटजी उभाच राहतो.)

**राजा** : ज्योतिषाचार्य, आज आपली येथे परीक्षा घेण्यात येईल आणि नंतर आपल्या कर्तबगारीचे बक्षीस.

**पार्वती** : पण महाराज त्यांनी एवढी चोरी शोधून काढली आणखी कसली परीक्षा ?

**प्रधान** : आपण गप्प बसा. वास्तविक स्त्रियांनी दरबारात येण्याची काहीही आवश्यकता नाही. परंतु आपल्या पतीच्या जीवनमरणाचा प्रश्न असल्याने आपल्याला येथें येऊ दिले.

**पार्वती** : जीवनमरणाचा ? (राजाचे पाय धरते.) महाराज काय हा प्रसंग ?

**प्रधान** : पार्वतीबाई हा तमाशा बंद करा. शंकरभट या मूल्यवान कुंभात एक वस्तू ठेवली आहे. यात काय आहे याचे आपण उत्तर द्या. या प्रश्नाचे उत्तर या लिफाफ्यात बंद आहे. लिफाफा मी महाराजांच्या हाती देतो. विचार करून यात काय आहे ते सांगा.

**पार्वती** : महाराज क्षमा करा. पण ते स्पष्ट उत्तरे कधीच देत

नाहीत- ते म्हणतात मी सांकेतिक भाषेत बोलतो. आपण ते ओळखावं लागतं.

**प्रधान** : ठीक आहे. बोलू दे. ओळखू आम्ही.

**राजा** : थांबा जरा. (लिफाफा फोडतो. त्यातील उत्तर मनात वाचतो पुन्हां घडी करून ठेवतो) (भटजी मधोमध उभे आहेत. पुढचात कुंभ आहे. मागे राजा व प्रधान बसले आहेत. पार्वती कावरी बावरी झाली आहे. एका दरवाज्यांत जिव्हा. दुसऱ्यात हुजऱ्या उभा आहे.)

**प्रधान** : हं ज्योतिषाचार्य सांगा आता तुमचे भविष्य. होऊन जाऊ दे अंतर्ज्ञानाची पारख.

**भटजी** : (डोळे मिटून परमेश्वराला नमस्कार करतो. त्याची प्रत्येक कृती सर्वजण बारकाईने पाहतात.) आई जगदंबे तुला साष्टांग प्राणिपात. आई तू माझी जन्मदात्री. आज तुझ्या लाडक्या बेडकाची ही काय अवस्था ? जगात हसत खेळत आनंदाने वावरणाऱ्या या बेडकाला एखाद्या कुंभात कोंडून त्या कुंभाचे तोंडच जणु बांधून टाकले आहे ग. (रडूं लागतो.) आई, आई. सगळा अंधार पसरला आहे. तुझा लाडका बेडूक या उघडया जगात टणा टणा उडया मारायचा सोडून क्रूरपणे एका राजवाडयाच्या कुंभात बंद करून टाकलाय. आई सोडव. सोडव त्याला. (डोळे टिपतो) आई एकदा तरी बेडूक म्हणून हाक मार ग.

**पार्वती** : अहो काय हे बोलता ? हे काय घर आहे का ?

**राजा** : (घाई घाईने उठतो. शंकरभटाच्या पाया पडतो) महाराज क्षमा करा. फार मोठा अपराध झाला. मी आपली परीक्षा घेणारा कोण ? (भटजी त्याला उठवतात.) समस्त दरबारी जनहो, हा पाहा लिफाफा. आपल्याला वाटेल हा कुंभ रत्नांनी भरलेला आहे. पण तसे नाही. यात पाणी भरलें असून त्यात एक बेडूक आहे व त्याचे

तोंड बांधले आहे. (प्रधान कुंभाचे तोंड सोडतो. आत पाणी असते. त्यात लांबून खरा वाटेल असा एक बेडूक असतो. शंकरभट बेडूक काढतो. प्रधान स्तिमित होतो.)

**राजा** : महाराज आजपासून आम्ही आपल्याला आमच्या राज्याचे मुख्य प्रधान केले आहे. (त्याच्या गळ्यात राजा माळ घालतो.) बसा या प्रधानकीच्या खुर्चीवर.

**शंकरभट** : क्षमा करा. महाराज. आपण मला आग्रह करू नका. मी आहे तसाच बरा आहे.

**राजा** : असें कसें होईल ? राज्याला आपल्यासारख्या बुद्धिमान, सदाचरणी पंतप्रधानाची फार आवश्यकता आहे.

**भटजी** : नको महाराज, मी आहे तसाच बरा आहे.

**पार्वती** : अहो असं काय करता ? चला की. बसा या खुर्चीवर

(तो हालत नाही.)

**प्रधान** : महाराज. बसा आपण, मी हरलो. आपण जिंकलात.

**भटजी** : मी कुठे लढाई केली आहे जिंकायला ?

**राजा** : महाराज आता नका लाजवूं. प्रधानपद नको असल्यास राजगुरु म्हणून मी आपली पूजा करीन.

**पार्वती** : अहो असं काय करता ? चला की. देव देतो अन कर्म नेतं. (तो हालत नाही असें पाहून खुर्चीच त्याच्या जवळ नेते.) अहो बसा की आता तरी. (तो बसत नाहीं असें पाहून स्वत:च त्या खुर्चीवर बसते. राजा व प्रधान एकदा पार्वतीकडे व एकदा एकमेकांकडे पाहातात. जिन्हा व हुजऱ्या एकमेकांकडे पाहून हंसू [illegible] अंकाचा पडदा पडतो.)

सं ठाणे वाचनालय ठाणे
०९६५ नों दि
IRBK-0110965